Agrowon, 30/08/2026

# आटपाडीत डाळिंब प्रतवारीची आधुनिक यंत्रणा लवकरच

## पणनमंत्री जयकुमार रावल यांची ग्वाही

**आटपाडी, जि. सांगली :** डाळिंब सौदे बाजारासाठी प्रसिद्ध असलेल्या येथील बाजार समितीच्या डाळिंब पणन संकुलासाठी डाळिंबाची प्रतवारी करणारी आधुनिक यंत्रणा लवकरच मिळणार आहे, अशी ग्वाही राज्याचे पणनमंत्री जयकुमार रावल यांनी दिल्याची माहिती सभापती संतोष पुजारी यांनी दिली.

येथील बाजार समितीच्या डाळिंब सौदे बाजारात आठवड्यातील सहा दिवस डाळिंबाचे लिलाव होतात. खरेदीसाठी बाहेरील व्यापारी मोठ्या संख्येने येतात. सध्या रोज २५० ते ३५० टन डाळिंबाची आवक होते. त्यामुळे डाळिंबाची प्रतवारी करणारी अत्याधुनिक यंत्रणा उपलब्ध करून देण्याची मागणी अडतदारांकडून गेल्या काही दिवसांपासून होत आहे. मंत्री रावल यांनी ही मागणी मान्य केली आहे. यावेळी संचालक सुबराव पाटील, राहुल गायकवाड, सुनील तळे, विठ्ठल गवळी, शशिकांत जाधव उपस्थित होते.

# आंब्याचा पल्प निघाला थेट सौदीकडे

## कोनड खुर्दच्या फ्रोझन मँगो पल्पची निर्यात; निर्यातीसाठी कंपनीसोबत करार

अॅग्रोवन वृत्तसेवा

बुलडाणा : चिखली तालुक्यातील कोनड खुर्द या छोट्याशा गावातील आभाळमाया अॅग्रो प्रोड्यूसर कंपनीने फळप्रक्रिया उद्योगाच्या माध्यमातून थेट आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत पाऊल ठेवले आहे. येथील कंपनीच्या फळप्रक्रिया केंद्रात तयार करण्यात आलेला उच्च दर्जाचा फ्रोझन मँगो पल्प सौदी अरेबियातील जेद्दा येथे निर्यात करण्यात आला.

या निर्यातीसाठी कंपनीसोबत करार करण्यात आला आहे. सौदी अरेबिया, दुबई, रशिया, युरोप आणि भारतातील बाजारपेठांमध्ये कार्यरत असलेल्या या कंपनीच्या ब्रँडअंतर्गत कोनड खुर्द येथील प्रक्रिया केंद्रात हा मँगो पल्प तयार करण्यात आला आहे.

या प्रकल्पातून तयार झालेला तब्बल २७ हजार ३६० किलो फ्रोझन मँगो पल्पचा कंटेनर सौदी अरेबियाकडे रवाना करण्यात आला. या वेळी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी संतोष डाबरे आणि जिल्हा उद्योग केंद्राचे सहसंचालक सागर लांडे यांच्या हस्ते हिरवी झेंडा दाखविण्यात आली.



**बुलडाणा : आभाळमाया अॅग्रो प्रोड्यूसर कंपनीचा मँगो पल्प घेऊन निघालेल्या कंटेनरला हिरवी झेंडी दाखविताना जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी संतोष डाबरे, राजीव जावळे व इतर.**

आभाळमाया अॅग्रो प्रोड्यूसर कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक राजीव जावळे पाटील यांनी सांगितले, की पहिल्या निर्यातीपाठोपाठ आणखी दोन कंटेनर मँगो पल्प सौदी अरेबियाला पाठविण्यात येणार आहेत. त्यानंतर फ्रोझन पेरू पल्पाच्या निर्यातीचेही नियोजन करण्यात आले आहे.

या वेळी तालुका कृषी अधिकारी अशोक सुरडकर, आत्मा प्रकल्प उपसंचालक दीपक बुटे, झेन अॅग्रोचे निर्यात व्यवस्थापक बिलाल काझी, गुणवत्ता व्यवस्थापक माजिद खान, आभाळमाया अॅग्रो प्रोड्यूसर कंपनीचे संचालक रंगनाथ पाटील जावळे, गणेश जावळे, गजानन जावळे यांच्यासह कंपनीचे पदाधिकारी व अधिकारी उपस्थित होते.

Agrowon, 18/08/2026

# गूळ उद्योगासाठी स्वतंत्र कायदा

## साखर आयुक्तालय सुधारित मसुदा शासनाकडे पाठविणार

सकाळ वृत्तसेवा

**पुणे :** पारंपरिक गुऱ्हाळांपासून मोठ्या औद्योगिक प्रकल्पांपर्यंत विस्तारलेल्या गूळ उद्योगाला आता कायद्याच्या चौकटीत आणण्याच्या हालचालींना वेग आला आहे. स्वतंत्र कायद्याचा मसुदा साखर आयुक्तालयाने शासनाकडे पाठवला होता. शासनाने त्यामध्ये काही दुरुस्त्या व बदल सुचवले आहेत. त्यावर या आठवड्यात बैठक होण्याची शक्यता असून, सुधारित मसुदा पुन्हा शासनाला पाठविण्यात येणार आहे.



गुळाचा व्यवसाय गेल्या काही वर्षांत मोठ्या प्रमाणावर बदलला आहे. पूर्वी शेतकरी स्वतःच्या शेतातील ऊस किंवा शेजारील शेतकऱ्यांकडून ऊस घेऊन गुऱ्हाळात गूळ तयार करीत होते. मात्र, आता या व्यवसायाला व्यावसायिक आणि औद्योगिक स्वरूप आले आहे. मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करून प्रतिदिन शेकडो टन उसाचे गाळप करणारे प्रकल्प राज्यात सुरू झाले आहेत. पुणे जिल्ह्यातील दौंड तालुक्यासह कोल्हापूर जिल्ह्यात गूळ उत्पादन मोठ्या प्रमाणावर होते. या पार्श्वभूमीवर गूळ उद्योगासाठी स्वतंत्र कायदा करण्याचा निर्णय घेण्यात आला. कायद्याचा मसुदा तयार करून साखर आयुक्तालयाने तो शासनाकडे पाठवला. शासनस्तरावर मसुद्याचा विचार केल्यानंतर काही तरतुदींमध्ये दुरुस्ती तसेच अधिक विचारविनिमयाची आवश्यकता असल्याचे स्पष्ट करण्यात आले. शासनाच्या सूचनांनुसार मसुद्यात आवश्यक बदल केले जाणार आहेत. यासाठी संबंधित विभाग आणि अधिकाऱ्यांशी चर्चा करण्यात येणार असून, या आठवड्यात बैठक होण्याची शक्यता आहे. त्यानंतर सुधारित मसुदा शासनाला सादर केला जाणार आहे. शासनाची मंजुरी मिळाल्यानंतर पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू होण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

### सध्या कुठलेही नियंत्रण नाही

सध्या मोठ्या गूळ उत्पादन प्रकल्पांच्या कामकाजावर साखर कारखान्यांप्रमाणे स्वतंत्र नियंत्रण व्यवस्था नाही. त्यामुळे ऊस खरेदीची पद्धत, शेतकऱ्यांना दिला जाणारा दर, उत्पादन प्रक्रिया, प्रदूषण नियंत्रण तसेच अन्य औद्योगिक नियमांचे पालन याबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. प्रस्तावित कायद्यानुसार प्रतिदिन २५ टन किंवा त्यापेक्षा अधिक ऊस गाळप क्षमता असलेल्या गूळ उत्पादन प्रकल्पांचा कायद्याच्या कक्षेत समावेश होऊ शकतो.

> “
> गूळ उद्योगासाठी प्रस्तावित कायद्याचा मसुदा शासनाला पाठवला होता. शासनाकडून काही दुरुस्त्या आणि बदल सुचविण्यात आले आहेत. त्यावर संबंधितांशी चर्चा करून आवश्यक बदल केले जातील. यासंदर्भात या आठवड्यात बैठक होईल, त्यानंतर सुधारित मसुदा शासनाला पाठविण्यात येईल.
>
> **- डॉ. संजय कोलते,**
> साखर आयुक्त